MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३०४ | शनिवार दि.२७ जुलै २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -304 | SATURDAY DT. 27 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## अंगावरील साडी नदीत फेकली, वाहून जाणाऱ्या दोघांना वाचवलं, कोपरगावच्या जिगरबाज ताईबाई देवदूत बनून आल्या!

कोपरगाव : नदीपात्रात असणाऱ्या मोटारी काढण्यासाठी गेलेले तीन तरुण नदीत वाहून गेले. मात्र जवळच असलेल्या पवार दाम्पत्याने हे पाहिलं आणि ताईबाई पवार यांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या अंगावरील साडी काढत दोन्ही मुलांच्या दिशेने फेकली. त्यातील दोन मुलांना वाचवण्यात यश मिळवलं. मात्र, या घटनेत एका तरुण शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झालाय. ताईबाई पवार व तिच्या नवऱ्याने दाखवलेल्या धाडसाचं आता सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, राज्यात पावसाने (ठरळप) समाधानकारक हजेरी लावल्यानंतर अनेक धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ होत आहे. दारणा धरणातून (ऊीपर ऊा) पाण्याची आवक होत असल्याने गोदावरी नदीपात्रात (त्र्ब्वरींरीळ ठळींशी) पाणी सोडण्यात आलं. पाणी सोडल्याचे कळताच कोपरगाव (घेरीसिरेप) तालुक्यातील हंडेवाडी –मंजूर येथील गोदावरी नदीवरील कोल्हापूर टाईपचा मंजूर बंधारा असून या पुलाजवळ शेतकरी संतोष भिमाशंकर तांगतोडे (२५), अमोल भिमाशंकर तांगतोडे (३०), प्रदिप भिमाशंकर तांगतोडे (२८) व नारायण भिकाजी तांगतोडे (५२) हे नदी किनारी मोटारी काढण्यासाठी गेले.

# बीड न. प चे तत्कालीन सी ओ उत्कर्ष गुट्टे, सलीम ट्रेसरने नालायकपणाचा कळस गाठला?

बीड (प्रतिनिधी)
नगर पालिकेत सय्यद सलीम ट्रेसर असणाऱ्या परंतु सगळं बीड नगरपरिषद चा कारभार एकहाती चालविणाऱ्या सलीम उर्फ डि के या व्यक्तीने हिंदू स्मशानभूमीची जागा मुस्लिमांच्या संस्थेला देण्याचा उद्योग केला आहे. सलीम ट्रेसर उत्कर्ष गुट्टे यांनी केला आहे. यामध्ये तत्कालीन सिइओ उत्कर्ष गुट्टे यांचाही मोठा वाटा आहे. याबाबत मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार करूनही अद्याप कसलीच कारवाई झालेली नाही हे विशेष.
शहरातील हिंदु स्मशानभूमीच्या पूर्वेकडील जागेची चतु; सिमा बदलून तत्किालन सीओ उत्कर्ष गुट्टे ओणि ट्रेसर सय्यद सलीम यांनी खोटे दस्तावेज तयार केले. या दस्तावेजाच्या आधारे हिंदुंची स्मशनभूमीची जागा हडपण्याचा या दोघांचा प्रयत्न होता. मात्र या प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ११ जून रोजी तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत सीओ गुट्टे आणि ट्रेसर सलीम यांची चौकशी करुन गुन्हा दाखल करावा असे आदेश राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.



**सलीम ट्रेसरने हिंदू स्मशानभूमीची जागा विकली! – सचिन मुळूक**

**शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली मुख्यमंत्र्यांकडे तक्रार आर्थिक व्यवहारातून संबंधित प्रकरण झाल्याची बीड नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांच्या तोंडून दबक्या आवाजात चर्चा?**

**तत्कालीन सीईओ उत्कर्ष कुठे सलीम ट्रेसर या प्रकरणी मीडियासमोर येऊन माहिती सांगतील का?**

**लहान मुलांची हिंदू समशानभूमी च्या जागेवर रस्त्याच्या नावाखाली भगवान बाबा प्रतिष्ठानने अतिक्रमण करत कब्जा केला.?**

**शहरातील भगवान बाबा प्रतिष्ठानच्या पाठीमागील ची बाजू म्हणजे बार्शी नाकाचा पुलाजवळून सोमेश्वर मंदिराच्या समोरून गेलेल्या रस्त्यावरून जात असताना लहान मुलांच्या समशानभूमीची जागाही भगवान बाबा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांकडून अतिक्रमणाच्या विळख्यात?**

**उत्कर्ष कुठे चा अक्षरशा बीड शहरातील अनेक बांधकामांना बेकायदेशीरपणे पाठिंबा देत बीड शहरात बीड नगर परिषदेच्या अनेक कामांमध्ये नंगानाच या अगोदर सुद्धा बीडच्या जनतेने पाहिलेला आहे?**

**सलीम ट्रेसर व उत्कर्ष गुट्टे ची सखोल चौकशी होणे गरजेचे? सलीम ट्रेसर चे बीड शहरातील अनेक जागांचे वादग्रस्त प्रकरण या अगोदर अनेकदा गाजलेले आहेत? सचिन मुळक यांनी योग्यवेळी मुद्दा उपस्थित करून दोन समाजामध्ये तीळ निर्माण होण्याच्या अगोदर सावधान भूमिका घेतल्याने मोठी घटना घडण्याअगोदर प्रशासन जाग होईल का?**

**दोन समाजामध्ये तेढ निर्माण होण्याच्या अगोदर सचिन मुळक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली तक्रार संबंधित प्रकरणाकडे नगर प्रशासन गांभीर्याने पाहणार का?**


सीओ उत्कर्ष गुट्टे आणि बीड नगर परिषदचा ट्रेसर सय्यद सलीम यांनी संगणमताने बनावट दस्तावेज तयार करुन बीडमध्ये मोठ्या प्रमाणात जमिनी हडपण्याचे प्रकार केले आहे. नालायकपणाचा कळस म्हणजे या दोघांना हिंदू स्मशानभूमीची जागाही पुरली नाही. गुट्टे, सलीम यांनी शहरातील सर्व्हे नंबर २८ मधील भगवानबाबा मंदिरा शेजारी असलेल्या हिंदू स्मशानभू मीच्या पूर्वेकडील (खासबाग देवी ते स्मशानभूमी ते बार्शी रोडकडे जाणारा रस्ता) या जागेची चतु; सिमा चुकीच्या पध्दतीने बदलून बनावट दस्तावेज तयार केले आणि सदरील जमीन हडपण्याचा या दोघांना कुटील डाव होता. एवढेच नव्हे तर या जागेवर काही लोकांना अतिक्रमण करायला लागवून जाणून बुजून हिंदु मुस्लीम समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सिईओ गुट्टे, सलीम यांनी मिळून केला आहे. सदरील बाब शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी हिंदु स्मशानभूमीची जमिन हडपून दोन समाजात तेढ निर्माण करणारे तत्किालन सीओ गुट्टे व बीड नगरपरिषदेचा ट्रेसर सय्यद सलीम यांच्यावर कार्यवाही करुन गुन्हा दाखल करावा तसेच त्यांना निलंबित करावे अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्र्यांनी सदरील प्रकरणाची कायदेशीर कार्यवाही करुन तत्कालीन सीईओ उत्कर्ष गुट्टे, बीड नगर परिषदेचा ट्रेसर सय्यद सलीम यांच्यावर गुन्हा दाखल करावा. असे आदेश बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. यानंतर सर्व प्रकरणाचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनात सादर करावा असे आदेशात म्हटले आहे. बीड शहरामध्ये बीड नगर परिषदेचा नंगानाच करणाऱ्या सलीम ट्रेसरचा



कोणीच काही वाकड करू शकत नाही का असा प्रश्न यावेळी उपस्थित होत आहे परंतु सलीम ट्रेसर हा या अगोदर सुद्धा अनेकदा वेगवेगळ्या प्रकारंमध्ये वादग्रस्त



ठरलेला आहे सलीम ट्रेसरची एकूण संपत्तीची चौकशी करून त्याच्यावरती योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी जनतेतून होत आहे संबंधित हिंदू समशान भूमीचे प्रकरण हे वेगळ्या स्वरूपाचे असून याला जातीचा रंग देव इच्छिणाऱ्या काही जणांचे मनसुबे



खालून पाडण्यामध्ये शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष सचिन भाऊ मुळूक यांचा प्रयत्न आहे यावेळी मात्र जातीय सलोखा राखणे हीच आपल्या भारतीय संस्कृती असल्याचे यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन भाऊ यांनी सांगितले आहे.

# जयभवानीचे सहा लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट – अमरसिंह पंडित

## जयभवानी सहकारी साखर कारखान्याचा रोलर पुजन समारंभ संपन्न

गेवराई (प्रतिनिधी) जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाची जय्यत तयारी झाली असून या गळीत हंगामात सहा लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात येत असल्याचे प्रतिपादन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. कारखान्याचे रोलर पुजन करताना ते बोलत होते. यावेळी मच्छिंद्रनाथ गडाचे महंत ह. भ. प. जनार्धन महाराज यांच्यासह कारखान्याचे संचालक, सभासद, शेतकरी, कामगार आदी उपस्थित होते.

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाचा रोलर पूजन समारंभ मच्छिंद्रनाथ गडाचे महंत ह. भ. प. जनार्धन महाराज यांच्या शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत शनिवार दि. २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाला. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, २०२३-२४ हंगामातील ११४ दिवसात ५ लाख १०१३ मेट्रिक टन ऊसाचे गाळप करून ४ लाख २०७९० पोते साखर उत्पादन झालेले आहे, ९. ४९ टक्के सरासरी साखर उतारा आलेला आहे. आसवणी प्रकल्पामधून ६२ लक्ष ८९२३७ बल्क लिटर एवढे बी-हेवी स्पिरीट उत्पादित झालेले आहे. गळीत हंगाम २०२४-२५ साठी कार्यक्षेत्रात ९१६० हेक्टर ऊसाची नोंद झाली असून त्यापासून अंदाजे ५.५० लाख मेट्रिक टन ऊस गाळपास उपलब्ध होईल तसेच बिगर नोंदीचा ११०० हेक्टर ऊस असून त्यापासून ६० हजार मेट्रिक टन ऊस उपलब्ध होणार आहे. एकूण ६ लाख १० हजार मेट्रिक टन ऊस कारखाना कार्यक्षेत्रात उपलब्ध आहे.



कारखान्याने ऊस तोड वाहतूक यंत्रणेची जय्यत तयारी केलेली आहे. मागील हंगामातील ऊसाची सर्व देयके कारखान्याने अदा केली आहेत. काटकसरीने कारखाना चालविल्यामुळे ऊसाला चांगला भाव देण्यात यश आले आहे. कारखान्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसल्याचे सांगताना पुढच्या हंगामतही चांगला भाव देणार असल्याची हमी अमरसिंह पंडित यांनी दिली आहे.

प्रारंभी ह.भ.प. महंत जनार्धन महाराज, व जयभवानीचे जेष्ठ सभासद शिवाजीराव गोडबोले यांच्या शुभहस्ते रोलरची विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप, यांच्यासह संचालक सर्वश्री जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, राजेंद्र वारंगे, श्रीराम आरगडे, साहेबराव चव्हाण, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, कुमारराव ढाकणे, डॉ. विजयकुमार घाडगे, संभाजीराव पवळ, गणपतराव नाटकर, नारायणराव नवले, शंकरराव तौर, रावसाहेब देशमुख, ड. शरद चव्हाण, भिमराव मोरे, सुनील पाटील, संदीपान दातखिळ, जगन्नाथ दिवाण यांच्यासह हनुमान कोकणे, चंद्रकांत पंडित, भारतराव पंडित, विश्वांभर काकडे, बबनराव मुळे, गणपतराव राठोड, जयदीप औटी, फुलचंद बोरकर, विष्णुपंत घोंगडे, कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, चिफ इंजिनिअर अशोक होके, इंजि. ऋषिकेश देशमुख, मुख्य शेतकी अधिकारी जगन्नाथ शिंदे, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, डिस्टलरी इनचार्ज राजेंद्र बडे, सिव्हील इंजिनिअर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी एस.एन.औटे, संगणक विभागाचे धनाजी भोसले, खरेदी विभागाचे सुशांत सोळंके, हेड टाईम किपर सचिन उधे, यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, वाहतुक ठेकेदार, कामगार, कर्मचारी, अधिकारी व सभासद कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धारुर चे अधिकारी लोमटे साहेब प्राथमिक आरोग्य केंद्र भोगलवाडी येथे लक्ष देण्याची गरज

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

डॉक्टरांची सतत अनुपस्थिती किल्ले धारूर तालुक्यातील भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातले डॉक्टर रुग्णालयाच्या वेळेमध्ये येत नसुन सरकारी नियमाचे पालन करत नाहीत स्वतःच्याच टाईमानुसार ये जा करतात शासनाने निवासस्थान बांधले असतानाही त्या ठिकाणी निवासी राहत नाहीत

धारूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र भोगलवाडी येथील




कर्तव्यावरअसणारे डॉक्टर सतत गैरहजर राहत असल्यामुळे उपचारासाठी आलेल्या रुग्णांना तेलगाव व धारूर कडे खाजगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी जावे लागत आहे त्याचप्रमाणे शासनाने घालून दिलेल्या वेळेमध्ये सतत अनुपस्थित राहिल्यामुळे रुग्णांचे हाल पाहायला मिळतात या रुग्णालयांमध्ये डॉक्टरांचा मनमानी कारभार दिसून येत आहे रुग्णालयातील नियोजन हे अत्यंत नियमबाह्य आहे या भोगलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शासनाने लाख रुपये खर्च करून निवासस्थान बांधले असतानाही डॉक्टर निवासी न थांबता आपल्या परळी बीड व इतर शहराच्या ठिकाणी राहून आपल्या वेळेनुसार ये जा करतात याकडे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी लक्ष देण्याची मागणी भोगलवाडी व परिसरातील नागरिकांतून केली जात आहे .



आज शिवसेना अल्पसंख्यक कार्यालय में बीड पुलिस पद नियुक्ति होने पर, सय्यद असलम,सैय्यद शाहेद,सय्यद अफरान,का कामरान खान(शिवसेना अल्पसंख्यक जिल्हा अध्यक्ष)व मित्र परिवार की जानिब्से सत्कार किया गया और मुस्तकबिल के लिए नेक ख्वाहिशात का इजहार किया गया,इस मौके पर कामरान खान ने कहा की कडी महेनत व लगण से हम अपना और आनेवाली पीढी का भविष्य बदल सकते है,आनेवाले पोलीस भरती एक्झाम में बीड के युवाओं को ज्यादा से ज्यादा हिस्सा लेकर अपना भविष्य उज्ज्वल करना चाहिए इस तरह की अपिल की., इस मौके पर चडक्रके असद बेग,शैख अखिल,ईमरान खान,रिज़वान खान,शैख अत्थर,सैफ इनामदार,सय्यद रोमान,मोमिन उबेद उपस्थित थे.

# राणूबाईच्या वाडीत आमेरीकेचा पूरस्कार पार्थ पवारांकडून प्रसाद चा सन्मान

## ऊसतोड कामगाराच्या मुलांनो प्रसादचा आदर्श घ्या : राज्याध्यक्ष प्रदीप श्रीरंगराव भांगे

वडवणी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील केज तालूक्यातील जिवाची वाडी ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या छोट्याशा खेड्यातील , प्रसाद नागरगोजे या ऊसतोड कामगाराच्या मूलाला यूट्यूब कडून अवार्ड मिळाला आहे.प्रसाद नागरगोजे यांनी मोबाईल वरुन यूट्यूबवर काम करून खूप मोठ यश मिळवलं आहे. महाराष्ट्रात जवळपास ६० टक्के ऊसतोड मजुरी बीड जिल्ह्या त आहेत. एका ग्रामीण भागातील ऊसतोड मजुराच्या मुलाने, ऊस तोडत तोडत आपल्या बुद्धीचा उपयोग करून, मोबाईलचा इंटरनेट, वाया न घालवता, इकडे एक युट्युब प्रसाद जीटेक या नावाने , सुरू केले व शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचवण्याचं काम केलं. त्या केज तालुक्यातील जीवाचे वाडी अंतर्गत असणाऱ्या राणूबाईची वाडी म्हणजे आदिवासी एरिया पेक्षा कमी नाहीच. अजूनही दळणवळणाचा सर्वात मोठा प्रश्न तिथं आहे. लाईट आणि नेटवर्कचा प्रश्न सर्वात मोठा आहे. मात्र तरी पण या वाघ पट्ट्यानं, यशाचा शिखर गाठलंच आणि अमेरिकेने त्याला पुरस्कार जाहीरच केला. ऊस तोडणी करत, हा एक मोठं नाव समाजामध्ये



त्याने केल्यामुळे, बीड जिल्ह्यात अजून कोहिनूर आहेत. हे मात्र नक्कीच. महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे सुपुत्र, पार्थ पवार यांनी त्यांचा सन्मान केला. महाराष्ट्रात असे अनेक ग्रामीण भागात कोहिनूर आहेत आणि ते कुठेतरी चमकले पाहिजेत. असे वक्तव्य यावेळी त्यांनी बोलताना केले. बीड जिल्ह्याची मान उंचावण्याचं काम प्रसाद ने केले. जिल्हाभरात आनंद व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्यस्तर कामगार मुकादम वाहतूक संघटना या संघटनेचे राज्य संघटक लोक पत्रकार बी भांगे यांनी देखील ऊसतोड मजुरांच्या मुलाला, अमेरिकेचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल, शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील ऊसतोड मजुरांची मुलांनी, प्रसाद नागरगोजे यांच मार्गदर्शन घ्या

# आष्टी मतदारसंघातील नेत्यांना लागले डोहाळे!

## कोणाच्या पदरात पडणार विधानसभेची उमेदवारी

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी मतदार संघ भाजपाचा बालेकिल्ला मानला जात असला तरी या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ.बाळासाहेब आजबे हे सध्याचे आमदार आहेत.बालेकिल्ल्यात आतुन दोस्ती वरून कुस्ती झाल्याने बालेकिल्ला मजबूत राहिला नाही.पण आता येणाऱ्या विधान सभा निवडणुकीत कोणाच्या पदरात उमेदवारी पडणार यासाठी मात्तबर समजले जाणारे नेते कामाला लागल्याचे दिसून येत आहे.महाविकास आघाडीकडून माजी.आ.साहेबराव दरेकर, राम खाडे हे तर महायुतीकडून सुरेश धस, बाळासाहेब आजबे,भिमराव धोंडे हे चेहरे समोर आहेत.

आष्टी मतदारसंघातील चित्र सध्या वेगळ आहे. भाजप,राष्ट्रवादी,शिंदेसेना एकत्र झाल्याने महायुती अस्तित्वात आल्याने या महायुतीचे आष्टी मतदारसंघात सुरेश धस,बाळासाहेब आजबे,भिमराव धोंडे हे तीनही नेते सध्या एकत्रीत काम करत आहेत.विधान सभेची जागा कोणाच्या वाट्याला येईल हे अद्याप सांगता येत नसले तरी आपणच उमेदवारीचे दावेदार असणार असल्याने तीनही नेते कामाला लागले आहेत.पण ऐनवेळी कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडते हे सध्या सांगणे कठिण आहे.तर महाविकास आघाडीकडून माजी आमदार साहेबराव दरेकर, राम खाडे या दोन नावाची चर्चा आहे.दरेकर हे अपक्ष आमदार राहिले होते.त्याच बरोबर राजकारणातील नस त्याना चांगली माहीत आहे.त्याच बरोबर सामाजिक कार्यात मोठ्या प्रमाणावर नाव पुढे असलेले आणि महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत थेट संबध निर्माण केलेले राम खाडे याचे देखील नाव सध्या चर्चेत आहे.महाविकास आघाडीत दोन तर महायुतीत तीन असे एकूण पाच नेते मतदारसंघात सक्रिय झाल्याने उमेदवारी देताना नेत्याना तारेवरीची कसरत करावी लागणार आहे.

# गेवराई तहसीलच्या पुरवठा विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

## रेशन दुकानदार आणि कार्ड धारकांना न विचारता जोडले कार्ड

सिरसदेवी /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील रेशन दुकान क्र ०२ चे मालक शोभा सुधाकर वक्ते यांनी विद्या पिनू अडागळे,पूनम शाम अडागळे,शांताबाई नागूराव अडागळे या लाभार्थ्यांचे कार्ड दुकान क्र.०१ला जोडण्यात यावे असा अर्ज दि. ०४/०४/२०२४ ला गेवराई तहसीलदार यांना दिला होता कारण पूनम अडागळे, शांताबाई अडागळे, विद्या अडागळे हे कार्ड धारक वक्ते याच्या दुकानाच्या तक्रारी करत आहेत यामुळे शोभा वक्ते यांनी गेवराई तहसीलदार यांना त्यांचे दुकान परत सस्पेंड होण्याची शक्यता असल्याचे कारण देऊन कार्डधारकाला व रेशन दुकान क्र ०१ चे मालक यांना माहिती न देता तहसीलदार यांना वक्ते यांनी अर्ज दिला कि पूनम अडागळे, विद्या अडागळे, शांताबाई अडागळे याचे कार्ड दुकान क्र. ०१ ला जोडण्यात यावे असा अर्ज दिल्यामुळे पुरवठा विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

तो अर्ज गेवराई तहसीलदार यांनी कुठलीही माहिती न घेता सेवा सहकारी सोसायटी दुकान क्र ०१ चे मालक कैलास नांदे यांना माहिती न देता न विचारता वक्ते यांचा अर्ज मंजूर करून संबंधित कार्ड धारकांना पत्र देऊन सांगण्यात आले कि दुकान क्र ०१ ला आपले कार्ड जोडण्यात आले आहे आपण या दुकानातून धान्य घेण्यात यावे असे पत्र कार्ड धारकांना पाठवले परंतु हे पत्र पुनम अडागळे, शांताबाई अडागळे यांनी घेतले नाही ते परत पाठवले कारण शोभा सुधाकर वक्ते यांनी हा नवीन फंडा वापरून जो त्यांच्या विरुद्ध तक्रार करेल त्याचे अश्या प्रकारे कार्ड दुसऱ्या दुकानाला जोडण्यात येईल असा एक संदेश कार्ड धारकांना जात असल्यामुळे हे पत्र घेतले नाही.

दुकान क्र ०१ चे मालक कैलास उत्तमराव नांदे यांनी गेवराई तहसीलदार यांना अर्ज दिला आहे कि शोभा सुधाकर वक्ते यांनी माझ्या परस्पर मला न विचारता पुनम अडागळे, विद्या अडागळे, शांताबाई अडागळे या लाभार्त्याचे कार्ड दुकान क्र ०१ ला जोडले आहे. तसेच या कार्ड धारकांचे कार्ड दुकान क्र २ लाच ठेवण्यात यावे असा अर्ज कैलास नांदे यांनी दि. २६/०७/२०२४ रोजी गेवराई तहसीलदार यांना देऊन मागणी केली आहे.यामुळे गेवराई तहसीलच्या पुरवठा विभागाचा भोंगळ कारभार चालू आहे.

# बीड शहरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात मच्छर डासाचे प्रमाण

## नगरपरिषदेने शहरातील प्रभागांमध्ये फवारणी करण्यात यावी-जिल्हाप्रमुख परमेश्वर नाना तळेकर



बीड (प्रतिनिधी)

बीड शहरामध्ये सतत पाऊस व साचलेले खड्ड्यातील पाणी. नाल्यातील घाण पाणी कचऱ्याची घाण. यामुळे डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. म्हणून बीडमध्ये अनेक जणांना डेंगू व मलेरियाची लागण झालेली आहे. हॉस्पिटल पेशंट ने गच भरलेले आहेत. यावर नगरपालिका प्रशासन झोपला आहे का .असा सवाल उपस्थित होत आहे. पांगरी रोड मधील माऊली नगर येथील प्रत्येक घरातील दोन पेशंट दवाखान्यामध्ये ऍडमिट आहेत .अशीच परिस्थिती राहिली तर पूर्ण बीड मधील प्रत्येक घरातील नागरिक दवाखान्यांमध्ये ऍडमिट करावे लागतील. नगरपालिकेतील मुख्य अधिकारी शहरातील स्वच्छतेकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. असा उपस्थित प्रश्न होत आहे. यावर औषध फवारणी न झाल्यास नगरपालिकेवर मोर्चा काढण्यातील असा इशारा सरपंच / उपसरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर तळेकर यांनी दिला आहे.१:२१ ाि, २७/०७/२०२४ ऊशशरिज्ञि ढहेीरीं: जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे आमचे कर्तव्य-डॉ.योगेश क्षीरसागर

# राज्यस्तरीय खो-खो पंच शिबीराचे उदघाटन



गेवराई (प्रतिनिधी ) -महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व हिंगोली जिल्हा अमॅच्युअर खो -खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय खो-खो पंच शिबीराचे दि २७ जुलै रोजी उद्घाटन संपन्न झाले. उद्घाटन प्रसंगी आमदार राजू भैय्या नवघरे प्रमुख पाहुणे आमदार तानाजी मुटकुळे, सहसचिव महाराष्ट्र असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव, कार्याध्यक्ष श्री सचिन गोडबोले, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या पंच शिबीरात खो - खो खेळातील नियमातील मधील बदल, काही दुरुस्ती करण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावरती खो - खो ला मोठे करण्याचे काम महाराष्ट्र खो-खो असोसिएशन करत आहे. त्यासाठी पंचांच्या कामगिरी खूप मोठे आहे त्यासाठी महाराष्ट्र खो -खो असोसिएशन दरवर्षी पंच शिबिराचे आयोजन करत असते. या शिबिराला महाराष्ट्र राज्यातून जवळपास २५० पंच प्रशिक्षक उपस्थित होते ..

# लोककलावंतांचा छ. संभाजीनगरमध्ये राज्यव्यापी मेळावा ..!

## कलावंतांच्या घरकुलांचा प्रश्न मार्गी लागेल - राजेंद्र मस्के मराठवाडा लोक कलावंत समितीची नियोजन बैठक संपन्न..!

बीड (प्रतिनिधी)

लोककला समाजाचे सांस्कृतिक जीवन प्रतिबिंबित करतात. महाराष्ट्राला लोककलेचा फार मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. तिचे अस्तित्व आणि संवर्धन करण्यासाठी भाजपा महायुतीचे राज्य सरकार कटीबद्ध आहे. मानधनात दुप्पट वाढ करून, संस्कृतीक मंत्री मूनगुंटीवार यांनी कलावंतांना मोठा आर्थिक आधार दिला. राजाश्रयाशिवाय लोक कलावंतांचे कल्याण होणार नाही. कल्याणकारी निर्णय व्हावेत यासाठी १७ ऑगस्ट २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मूनगुंटीवार व मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय लोककलावंतांचा मेळावा संपन्न होत आहे. या मेळाव्यात प्रत्येक लोककलावंतानी घरकुल मिळावे यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय होईल अशी अपेक्षा भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली.




लोक कलावंतांच्या भव्य मेळावा नियोजानासाठी आज संघर्षयोद्धा भाजपा संपर्क कार्यलय बीड येथे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, महाराष्ट्र प्रदेश सचिव, लोक कलावंत प्रकोष्ठ प्रमुख गणेश दहिफळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाड्यातील कलावंतांची बैठक संपन्न झाली.या मेळाव्यास लोक कलावंत समिती मराठवाडा अध्यक्ष सुमित धुमाळ, वृद्ध कलाकार मानधन समिती सदस्य कैलास काटे, सांस्कृतिक प्रकोष्ठ जिल्हा संयोजक प्रमोद रामदासी, रामदास कदम, काशिनाथ उबाळे, शाम धोंगडे, रामदास धुमाळ, अशोक जाधव, तुकाराम ठोंबरे, परमेश्वर कराड, मोठे नाना, प्रभाकर महाराज कुटे, सिद्धेश्वर शिंदे, संजीवनी ताई, शेळके महाराज गैदास उगले, पत्रकार सचिन भंडारे, लिंबाजी ढवळे, भास्कर कांबळे, रामनाथ काटे, विलास काटे, मुरलीधर तरटे, अंकुश गरडकर, यांच्यासह लोक कलावंत मोठ्या संखेने उपस्थीत होते.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयतीनिमित्त व विवेक भैय्या थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर



विविध उपक्रम राबवून होणार वाढदिवस साजरी बीड येथील महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे यू. बीड जिल्हाध्यक्ष विवेक भैय्या थोरात यांच्या वाढदीवसानिमित्त व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम राबून साजरी होणार सालाबाद प्रमाणे यंदाही रक्तदान शिबिर , रुग्णांना फळ व बिस्कट वाटप व अनेक विविध कार्यक्रमाचे आयोजन केले असून या कार्यक्रमाला मित्र परिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संतोष तात्या थोरात युवा मंचा काढून करण्यात आले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या आष्टी तालुका उपाध्यक्ष पदी सावरगाव येथील उद्योजक अशोक शेठ मस्के यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी युवा उद्योजक प्रा तुकाराम शेठ मस्के माजी सरपंच आडसरे बंडू मरकड बाळासाहेब आडसरे सावित्राम मरकड आदी मान्यवर उपस्थित होते
छायाचित्र सुरेश कांबळे

# धनादेश अनादर प्रकरणी प्रशांत शिंदे यांची निर्दोष मुक्तता

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

३ लाख रुपयांचा धनादेश न वटल्याच्या कारणाहून येथील मोबाईल व्यवसायिक प्रशांत शिंदे यांची न्यायालयाने सबळ पुराव्या अभावे निर्दोष मुक्तता केली. या विषयी सविस्तर वृत्त असे की अंबाजोगाई शहरातील मोबाईल व्यवसायिक प्रशांत चंद्रकांत शिंदे यांनी तक्रारदार कल्याण लोमटे यांच्या कडुन ३ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. ते कर्ज परतफेड करण्यासाठी प्रशांत शिंदे यांनी कल्याण लोमटे यास धनादेश दिला होता सदर धनादेश बँकेत न वठल्या मुळे कल्याण लोमटे यांनी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी वर्ग २ यांच्या कडे एस एस सी क्रमांक १५०/२०२२ अन्वये फिर्याद दाखल केली या प्रकरणी घेण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळी फिर्यादी पक्षाने साक्षीदार व पुरावे दाखल केले मात्र त्यानंतर आरोपीचे



वकील ऍड अमित गिरवलकर यांचा युक्तिवाद व सादर केलेला पुरावा ग्राह्य धरून मे.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी क्र. २ श्री.शेख.बी.पाटील साहेब यांनी दिनांक २४ जुलै २०२४ रोजी सबळ पुराव्या अभावी प्रशांत शिंदे यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ॲड.अमित गिरवलकर यांनी काम पाहिले त्यांना ॲड.गुंडाप्पा बुरकुले, ड.नितीन जाधव, ड,राजकुमार चौरे यांनी सहकार्य केले.

# आष्टी वनक्षेत्रातील वन्यप्राण्याचे अस्तित्व धोक्यात

## भटक्या श्वानांकडून होऊ लागले जीवघेणे हल्ले!

आष्टी (प्रतिनिधी)

मोठ्या प्रमाणात दडण झाल्याने व त्यातच वन्यप्राण्याची संख्खा देखील दिवसेंदिवस वाढत चालली असली तरी कधी बिबट्याकडून तर कधी भटक्या श्वानाकडून हल्ले होऊ लागल्याने वन्यप्राण्याचे अस्तित्व धोक्यात येऊ लागल्याचे आठवड्यात घडलेल्या दोन घटनेवरून समोर आले आहे.

आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वनक्षेत्र आहे.त्यातच आता दडण देखील वाढली असून दिवसेंदिवस वन्यप्राण्याची संख्खा देखील वाढत चालली असल्याचे दिसुन येत असताना याच दडणीचा फायदा घेऊन वनक्षेत्रात मुक्त संचार करणारे बिबटे अधूनमधून हल्ले करीत आहेत. तर आता बिबट्या पाठोपाठ देखील भटक्या श्वानांच्या टोळीकडून देखील वन्यप्राण्यांवर हल्ले होऊ लागल्याने यात ते गंभीर जखमी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सुर्डी येथे हरणावर तर कारखेल येथे निलगायवर हल्ला चढवून यात ते दोनही प्राणी गंभीर जखमी झाले आहेत.या घटना एकाच आठवड्यात घडल्याने वन्यप्राण्याचे हक्काच्या कार्यक्षेत्रात आधीवास करताना अस्तित्व धोक्यात येत असल्याचे दिसुन येत आहे.

# जिल्ह्यातील बांधकाम कामगाराची आर्थिक लूट-दत्ता वाकसे

बीड(प्रतिनिधी)

राज्य शासनाकडून संपूर्ण राज्यातील मजूर वइमारत बांधकाम कामगारांसाठी त्यांना पूर्ण सशक्त व आर्थिक प्रगती व्हावी यासाठी मजूर इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळांतर्गत जिल्ह्यात बांधकाम मंजूर यांची ऑनलाईन नोदणी करिता खाजगी दलालाची फौज फिरून बांधकाम कामगाराची नोंद करून देतो यासाठी चिरीमिरी घेऊन बांधकाम मंजूर लाभार्थ्यांची लूट करीत असल्याचा आरोप शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केला आहे. महाराष्ट्र राज्यात राज्य सरकारकडून बांधकाम कामगार व इत्तर कामगारासाठी राज्य शासनाकडून मजुरी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृल मजुरासाठी शासनाकडून अनेक अनुदान तत्त्वावर योजना राबविल्या जातात त्यामध्यो मजुराच्या पाल्यांना शिक्षणासाठी व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिल्या जाते तर मजूर आहे त्या ठिकाणी काम करीत असलेल्या ठिकाणी शासनाकडून मध्याह भोजन देण्यात येते. तसेच मजुरांना

कामासाठी लागणारी सुरक्षा किट व महिलांना स्वयंपाक घरात लागणारे स्टील भांडे व तसेच मजुराच्या मुला मुलीच्या लग्नासाठी आर्थिक अनुदान व मजुरांचे कामावर आलेले अपंगत्व व तसेच कायम अपंगत्व यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ देण्यात येतो. तसेच प्रत्येक नोंदणीकृत लाभार्थ्यांचा अधिकृत कौटुंबिक विमा राज्य शासनाकडून काढला जात आहे. लाभार्थी

पती-पत्नी पैकी कुणाचेही एकाचे निधन झाल्यास त्यांच्या अंत्यविधीसाठी सुद्धा आर्थिक सहाय्य राज्य शासन करते कौटुंबिक आरोग्यासाठी सुद्धा शासन आर्थिक मदत अनुदान तत्त्वावर करत असते यासह इतर नोंदणी बांधकाम मजूर कल्याणासाठी अनेक योजना राज्य शासनाकडून अनुदान तत्त्वावर राबविल्या जात आहेत. परंतु बीड जिल्ह्यातील प्रत्येक गावात या योजनेचा लाभ लवकर मिळून देतो व तुम्हाला



कुठेही जाण्याची गरज नाही अशी बतावणी केल्या जात असल्याचे दलाकडून सांगण्यात येत आहे. नवीन बांधकाम मजूर नोंदणी करण्यासाठी लाभार्थ्याकडून मोठ्या प्रमाणात खाजगी दलाल आर्थिक लूट करीत आहेत. बीड जिल्ह्यातील संपूर्ण गावात अनधिकृत कार्यालयात झालेले दलालाचे जाळे कायम असून या जाळ्यात भोळ्या भाबड्या लाभार्थ्यांना फसवून लाखो रुपयाची मलिदा लुटणारे दलाल मंडळी कार्यरत आहे अशा दलाला विरुद्ध कारवाई करण्याची मागणी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी केले आहे. नोंदणी बांधकाम मजूरानी कुठलाही आर्थिक व्यवहार करू नये -वाकसेबीड जिल्ह्यात राज्य सरकारकडून नोंदणीकृत बांधकाम मंजूर व इतर कामगार यांच्यासह त्यांच्या पाल्य व कुटुंबातील सदस्यांना शासनातर्फ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या अंतर्गत विविध अनुदान तत्त्वावर अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहे. परंतु सदर योजनाही राज्य शासनाकडून विनाबदला व कुठलेही नोंदणी फिस अथवा शुल्क संबंधित कार्यालयाकडून घेतल्या जात नाही. परिणामी जिल्ह्यातील नोंदणीकृत बांधकाम मंजूर कामगार यांनी शासनाच्या योजनेचा कायदेशीर मार्गाने लाभ घ्यावा. याकरिता खाजगी दलाल यांच्या आमिषाला बळी न पडता व त्यांच्याशी कुठलाही आर्थिक व्यवहार करू नये, असे आवाहन वाकसे यांनी नोंदणीकृत बांधकाम मजुरांना केले आहे.

# बोलघेवड्या सरकारकडून निदान १५ ऑगस्टला तरी मोफत शालेय गणवेश मिळणार का?

लिंबागणेश:- राज्यसरकारने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून एक राज्य एट गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असुन समग्र शिक्षा अभियान व मोफत गणवेश वाटप योजने अंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इयत्ता पहिली ते आठवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असुन यामध्ये एक नियमित गणवेश संच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून स्थानिक महिला बचत गटांतर्फे शिलाई करून पुरविण्यात येणार आहे.तर स्काऊट या विषयास एक गणवेश संच संबंधित शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन शिलाई करून पुरविण्यात येणार आहे.मात्र शाळा सुरू होऊन दिड महिना तरीही अद्याप विद्यार्थ्यांना गणवेश न मिळाल्याने बोलघेवड्या सरकारकडून निदान १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी तरी विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश मिळणार का?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

निधी प्राप्त होताच मोफत गणवेश वाटप करण्यात येईल:- अमर पुरी (सहशिक्षक ( लिंबागणेश केंप्राजिपशा)

## दिड महिना उलटूनही विद्यार्थी गणवेशाच्या प्रतिक्षेत:- डॉ.गणेश ढवळे




लिंबागणेश:- राज्य शासनाच्या समग्र शिक्षण अभियान व मोफत गणवेश योजने अंतर्गत शालेय विद्यार्थी -विद्यार्थीनींना मोफत गणवेश वाटप करण्यात येते.मात्र यावर्षी शासनाचे धोरण बदलल्याने गणवेशासाठी कापड खरेदी करून ते शिवण्याचे काम स्थानिक बचत गटांना देण्यात येणार आहे.मात्र त्यासाठी आवश्यक निधी शाळेस अद्याप प्राप्त झालेला नाही.त्यामुळे मोफत गणवेश वाटपात विलंब होत आहे. निधी प्राप्त होताच गणवेशाचे वाटप करण्यात येईल असे सहशिक्षक अमर पुरी यांनी सांगितले.

लेकरं रोजच विचारतेत गणवेश कधी मिळणार?? विकत घ्यावा लागतो की काय ??:- पार्वतीबाई गायकवाड ( पालक)

दिड महिना झालं आज मिळणं उद्या मिळणं करीत दिड महिना झाला अजुन शाळेतुन मिळाला नाही.लेकरं रोजचं विचारतेत आता विकत घेऊन द्यावा का?? असा सवाल करत पालकांना खिशातुन पैसे खर्च करून गणवेश खरेदी करावा लागतो की काय अशी चिंता सतावत आहे.

# शिरूरमध्ये जनसंपर्क अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद, शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध - माजी आ. भीमराव धोंडे

आष्टी (प्रतिनिधी)

शिक्षकांना जुन्या पेन्शन प्रमाणे पेन्शन योजना लागू करणे, जि. प. शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे, पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावणे तसेच शिक्षकांचे इतर प्रश्न सोडविण्यासाठी मी बीड पासुन ते मंत्रालयापर्यंत प्रयत्न करील असे आश्वासन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शिरूर कासार येथे शिक्षक परिषदेत बोलताना दिले.

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी गुरुवारी दिनांक २५ जुलै रोजी जनसंपर्क अभियाना अंतर्गत शिरूर कासार शहरात व बाजारपेठेत फिरून लोकांच्या भेटी घेऊन व वृद्धांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. जनसंपर्क अभियान दौऱ्याच्या निमित्ताने माजी आ. भीमराव धोंडे यांचे ठिकठिकाणी वाजतगाजत व तोफा वाजवुन स्वागत करण्यात आले. आष्टी, पाटोदा, कडा नंतर शिरूर शहरातील दौऱ्याला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जि.प. शाळेत शिरूर केंद्राच्या शिक्षण परिषदेत पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, मी विधानसभा सदस्य असताना शिरूर येथील जि. प. शाळा बांधकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला होता. इमारतीचे भूमिपूजन व उद्घाटन माझ्याच हस्ते झाले होते. शिक्षकांना समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिक्षकांमुळेच माणसांची जडणघडण होते. आमच्या शेतकरी शिक्षण संस्थे मधून आतापर्यंत



हजारो शिक्षक व इतर अधिकारी घडले आहेत. शिरूर तालुका पुर्वी आष्टी मतदारसंघात नव्हता त्यामुळे या भागाचा संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक विकास करता आला नाही परंतु भविष्यात शिरूर तालुक्यात शैक्षणिक संस्था सुरू करण्याचा मानस भिमराव धोंडे यांनी व्यक्त केला. शिक्षकांमुळेच जिल्ह्याचा शैक्षणिक दर्जा चांगला आहे. शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. शिरूर तालुका शिक्षक पतसंस्थेचे काही भागभांडवल पाटोदा तालुका शिक्षक पतसंस्थेत गुंतलेले आहे ते मिळवुन देण्याची मागणी शिक्षकांनी केली त्यासाठी प्रयत्न करु असे भिमराव धोंडे यांनी सांगितले. शाळेच्या वतीने माजी आ. भिमराव धोंडे व अजयदादा धोंडे व इतरांचे मुख्याध्यापक खेडकर, मुख्याध्यापक मिसाळ, बाळासाहेब सिरसाठ यांनी स्वागत केले. दौऱ्यामध्ये भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे,किशोर खोले, माऊली पानसंबळ,सरपंच ज्ञानदेव केदार, एम.एन. बडे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. शिरूर तालुक्यातील मानूर येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कार्यकर्त्यांसोबत हॉटेलमध्ये चहा घेतला. शिरुर येथील थोरात वस्तीवर भेट दिली माजी आ.भिमराव धोंडे यांचे हस्ते लक्ष्मीमातेची पुजा करण्यात आली. दिवसभर पावसाची रिपरिप चालु होती त्या वातावरणात माजी आमदार भीमराव धोंडे यांनी शिरुर शहराचा दौरा केला, ग्रामस्थांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अभियाना दरम्यान माजी नगरसेवक सुनिल पाटील , बबनराव घोरपडे, पिनु बागल, हारुन आतार , सुधीर भांडेकर, वेदपाठक यांचे अमोल सुवर्णकार, कालिका स्टील सेंटर, सुभाष काटकर, दत्ता भुजबळ, शिलाताई शेलार,काळे दाजी,चोरमले, अभिलेश गाडेकर, रोहिदास गायके, कैलास गायके, गफुरभाई, गोविंद वखरे, बबनराव खामकर,उद्धव खेडकर, शंकरराव कातखडे, रामनाथ खेडकर, विजय गिरी,लखुळ मुळे,कांतीलाल देसरडा, शशिकांत बांगर,सत्तारभाई, ए. टी. राख व इतरांच्या निवासस्थानी भेटी दिल्या तसेच ज्योती क्रांती क्रेडिट सोसायटीस भेट दिली. सुभाष सोनवणे यांच्या मातोश्री निधन झाले तसेच बाबु संकोड यांच्या मुलीचे निधन झाले या दोन्ही कुटुंबांची भेट घेऊन सांत्वन केले.

ठिकठिकाणी झालेल्या भेटी दरम्यान , सरपंच अशोक पाखरे, जेष्ठ नेते दशरथ दादा वनवे, पोपट सिरसाठ, विठ्ठल वनवे, प्रल्हाद बडे, सुभाष सिरसाठ, अमोल पवार, पोपट बेळगे, भगवान पाखरे, मोहबत पठाण, सुर्यकांत बागल, रंगनाथ जाधव, बाबुराव झिरपे, खुदा शेख, शेरखान पठाण, अभीलाश गाडेकर, प्रल्हाद बडे, सुभाष सिरसाठ, अमोल पवार, पोपट बेळगे, भगवान पाखरे, मोहबत पठाण , पांडू थोरात, संदीपान राजगूडे, बबन थोरात, कैलास थोरात,अमर माळी , विजय थोरात, गोकुळ थोरात, उस्मान आतार, महारुद्र खेडकर,हारुन शेख,माजी उपसरपंच ढाकणे, अभिजित डंगूरवाला, संतोष सानप, प्रमोद दगडे, यासिनभाई, डॉ. निळेकर, डॉ. सानप, काळे दाजी,चोरमले, कैलास गायके, बबन खामकर, बाळासाहेब बांगर,आकाश खामकर व इतर उपस्थित होते.



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यामध्ये रोजगार हमीचे कामे अद्याप सुरू असून ते कामे पूर्ण होत नसून अद्याप कसल्याही प्रकारची कामे झालेली नाही तसेच ते काम पूर्ण झाले असल्याचे सांगण्यात येते व बोगस मस्टर उचलण्यात आले. तहसील आष्टी कार्यालय व संबंधित गुत्तेदार यांची आर्थिक देवाण घेवान चालू आहे असे समजत आहे .तरी शासनाचा कोट्यावधी रुपये खर्च होऊन सुद्धा आजही वस्ती रस्ते पानंद रस्ते पेवर ब्लॉक बसविणे ही सर्व कामे अपूर्ण शासनाचे जे धोरण आहे ते अपयशी ठरत आहे शेतकऱ्यांची जी अडचण आहे ती जशाच तशी आहे. तरी रोजगार हमी योजनेचे कामे पूर्ण होण्याअगोदर पूर्ण बिल उचलले जात आहे. आष्टी तालुक्यामध्ये जे रोजगार हमी योजनेचे कामे अद्यापही पूर्ण झालेली नाही त्या कामाचे पूर्णपणे चौकशी करण्यात यावी.

तरी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांनी याची चौकशी करून दोषीवर कार्यवाही .करावी अशी मागणी रवी काका ढोबळे राष्ट्रीय काँग्रेस पार्टी यांनी केली आहे.यावेळी उपस्थित आदिनाथ महाडीक,काकासाहेब कर्डीले,प्रविण चितळे,नवसे पाटील,दिलीप पाटील,रमेश पाटील,अरूणराव काकडे,राजु डावकर,आदि कॉग्रेस पदधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते



# बीडच्या गेवराई तालुक्यातील सेलू तांडा या ठिकाणी गेल्या ७० वर्षापासून गावाला जायला रस्ता नाही

**स्थानिक आमदार प्रशासनाचे दुर्लक्ष.**
**ग्रामस्थांचा येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय.**
**अभाल वृद्ध महिलांना ग्रामस्थांनी उचलून नेले दवाखान्यात.**

बीड (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील सेलू तांडा या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून मुख्य रस्ता गावाला नाही. याकडे ग्रामस्थांनी अनेकदा पाठपुरावा करून देखील या रस्त्याचे काम चालू झाले नाही. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जर आमच्या गावचा रस्ता जर नाही झाला.

# अखेर रोहन गलांडे पाटील यांच्या उपोषनाला आले यश !

केज/प्रतीनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला काम सुरू करण्यासाठीची तीर्थक्षेत्राचे काम प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषणाला बसले होते तरी उपोषणाच्या तीसऱ्या दीवशी सार्वजनिक बांधकाम केज यांनी प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली व मागण्या तीर्थक्षेत्राचे काम सुरू केल्यानंतर पुर्ण करण्यासाठी पाच मागणी मान्य,काम सुरू केल्यानंतर बंद करण्यात येणार नाही मागणी मान्य,तीर्थक्षेत्रांच्या कामासाठी लागणारी पुर्ण सामग्री कार्यक्षेत्रात उपलब्ध कधी तर उपलब्ध केली आहे मागणी मान्य ,तीर्थक्षेत्र तात्काळ कामाला स्वता गुत्तेदार , बांधकाम विभागाचे अधिकारी, गावकरी यांच्या हस्ते नारळ फोडुन करण्यात यावे मागणी मान्य.काम बंद केले तर याला




पत्रकार, सरपंच,माजी आमदार, प्रशासनाने सोडले उपोषण
दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या बातमीचा इफेक्ट

जबाबदार कार्यकारी अभियंता युवराज मळीकर आहे

वरील प्रमाणे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व मागण्या मान्य करून व इतर मागण्या व मागिल उपोषणातील मागण्या मान्य करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे व रोहन गलांडे पाटील यांनी उपोषणाला काम पुर्ण होईपर्यंत स्थगिती दिली यावेळी उपस्थित माजी आमदार पृथ्वीराज साठे, जेष्ठ नेते सुरेश तात्या पाटील, माजी सरपंच सुनील बापु देशमुख, मंडळ अधिकारी मस्के साहेब,तलाठी क्षीरसागर साहेब,जेष्ठ पत्रकार रामदासजी तपसे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, युवराज मगर सर, शिवाजी आबा गायकवाड,जेष्ठ शिवसैनिक लक्ष्मीमन तात्या गलांडे, दत्ता पाटील गलांडे,अभियंता अतुल मुंडे, गुत्तेदार चंदनशिव, अशोकराव देशमुख, मुन्ना नखाते, भैरवनाथ हुंबे, जालिंदर हुंबे, बाळासाहेब घोडके व जेष्ठ , समाजसेवक व गावकऱ्यांच्या मदतीने अखेर रोहन गलांडे पाटील यांनी अमरण उपोषणाला काल स्थगिती दिली यावेळी बोलताना रोहन गलांडे यांनी म्हटले तीर्थक्षेत्र विकास कामाचे यश माझे नसुन लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकार, संपादक, उपसंपादक , न्यूज, पोर्टल व सर्व सहकाऱ्यांचे आहे असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे.

# तलवाडा ग्रामपंचायत भ्रष्टाचाराचे आगार

## तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या एमआरजीएस ( नरेगा ) घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करण्यात यावी

### आरपीआयच्या वतीने सुमेध करडे, विनोद आठवले उपोषणास बसणार मा जिल्हाधिकारी , बीड यांना निवेदन दिले आहे

तलवाडा (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत एमआरजीएस( नरेगा ) चा बोगस कागदपत्रे मास्टर तयार करून शासनाच्या लाखो रुपयाचा अपहार केल्यामुळे पाच ऑगस्टपर्यंत तात्काळ समिती स्थापन करून उच्चस्तरीय चौकशी करून सरपंच,ग्रामसेवक, संबंधित अभियंता , ग्राम रोजगार सेवक व संबंधित अधिकारी यांचेवर तात्काळ नियमानुसार कारवाई करण्यात यावी ,अन्यथा दि. पाच ऑगस्ट, २०२४ तलवाडा ग्रामपंचायत समोर आरपीआयच्या वतीने तलवाडा युवा सर्कल प्रमुख सुमेध करडे, तसेच सर्कल प्रमुख विनोद आठवले हे आमरण उपोषणास बसणार आहेत असे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात आले आहे

जिल्हाधिकारी साहेब यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सरपंच, ग्रामपंचायत तलवाडा ,ग्रामसेवक, ग्रामरोजगर सेवक संबंधित पंचायत समिती , गेवराई मधे कार्यरत अधिकारी व अभियंता यांनी संगनमत करून तलवाडा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात रोजगार हमी योजनेअंतर्गत व इतर कामात प्रचंड अनियमितता व केलेली आहे. तसेच कित्येक कामे फक्त कागदोपत्री दाखवून खूप मोठा भ्रष्टाचार केलेला आहे.

१ ) मोहगणी वृक्ष लागवड , तुती लागवड : -मोहगणी वृक्ष लागवड व तुती ची प्रत्येक्षात लागवड न करता ,लागवड कागदोपत्री दाखवून संगणमताने भ्रष्टाचार केलेला आहे. कांही प्रकरणात मयत व्यक्तींच्या नावे मोहगणी वृक्ष लागवड दाखवून शासन निधीचा अपहार केलेला आहे . २ ) *जल सिंचन विही :-सरपंच व ग्रामसेवक यांनी संगणमताने कांही प्रकरणात विहिरीचे संपूर्ण काम न करता कुशल व अकुल बील उचलून शासकीय निधीचा खूप मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. ३) मनरेगा अंतर्गत पांदण रस्ते व सिमेंट रस्ते मनरेगा अंतर्गत पांदण रस्त्याची कामे अत्यंत निकृष्ठ दर्जाची झाली आहेत . उदाहरणार्थ, गावची पूर्वेकडील वेस ते खटकली रस्ता १ ज्ञा . ळळ ) सिमेंट रस्ता :- र) गणपती मंदीर देवीच्या पायथ्यापासून ते गोविंदवाडी रोड . जुन्या, अस्तित्वात असलेल्या खडी व मुरूम युक्त रस्त्यावर सिमेंट काँक्रिट वाळूचा थर , साधारण २ ते ३ इंच थर देऊन गेवराई-- तलवाडा - माजलगाव राज्य महामार्ग येतपर्यंतच केला . ( अंदाजे ३०० ते ३५० मीटर ). गोविंदवाडी रोड पर्यंत काम केलेच नाही . सदरील कामाचे बील ठी २७,००,०००/- ( सत्तावीस लक्ष )उचलले .ळळळ) सिमेंट रस्ता :- ऑनलाइन रस्त्याचे लोकेशन दाखवले नाही . सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक बसवणे या कामासाठी ठी ८,०३,०००/- उचलले . मनरेगा अंतर्गत असा गावात रस्ताच झाला नाही .

४) दलित वस्ती विकास :- ( २०२३-२४) ळ) चांभार वस्ती, ढोर समाज वस्ती व मातंग वस्ती येथे पूर्वीच सिमेंट रस्ता अस्तित्वात होता . यांचं रोडवर पेव्हर ब्लॉक बसवून, ठी. १४,००,०००/- रू खर्च दाखवून प्रचंड शासन निधीचा अपहार केला. ळळ) मातंग वस्ती तलवाडा येथे ठी ७,००,०००/- (सात लक्ष ) चे निकृष्ठ दर्जाचे हाय मास्ट दिवे बसवले ( भारतीय बनावटीचे ऐवजी चायना बनावटीचे असावेत ) . हा दलित समाजावर आर्थिक अन्याय आहे. २०२४- २५:- दलित वस्ती विकास निधी ठी ६०,००,०००/ - प्राप्त . नवीन गणेश नगर व नवीन मातंग वस्ती अस्तित्वात नाही, पण यासाठी फंड प्राप्त. चुकीची माहिती सादर करून फंड प्राप्त व अनियमित खर्च . याचीही सखोल चौकशी झालीच पाहिजे

५) पाणी पुरवठा:- पाणी- पुरवठा करीता १५ वा वित्त आयोग निधी, विशेष घटक योजनेमधून, न .झ , व सामान्य निधी मधून ५० ते ५५ लक्ष खर्च केले . याची सर्वकस चौकशी करावी कारण विशेष घटक योजने अंतर्गत ९ लक्ष रू उचलून फक्त दोन ते तअडीच लक्ष खर्च करून तलावात विहीर खोदली पण अंबिका नगरसाठी योजना पूर्ण न करता शासन निधीचा अपहार केला .

६); पंधरावा वित्त अयोगातून खर्च:-

पंधराव्या वित्त अयोगातून झालेले सर्व सिमेंट रस्ते , ड्रेनेज, अंडर ग्राउंड नाली, स्मशान भूमी इत्यादींची कामे अत्यंत निकृष्ठ दर्जाची झाली आहेत. या कामात प्रचंड अनियमितता व भ्रष्टाचार झाला आहे. *

७) तांडा वस्ती विकास कामे:-

राजुरी मळा तांडा ठी २०,००,०००/- ( वीस लाख ) . देवितांडा ठी २०,००,०००/- (वीस लाख )एस्टीमेट / टेंडर नोटीस प्रमाणे काम नाही केले, खडी नाही, कपचा नाही दाबाई नाही , फक्त मुरूम दाबाई करून व सिमेंट वाळूचा मिक्स करून थर अडीच तीन इंच वटाकला . व रोड तयार केला. प्रचंड भ्रष्टाचार.

यापूर्वी कित्येकदा काही वृत्तपत्र दैनिकांनी तलवाडा ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचाराविषयी वृत्तपत्रातून आवाज उठवला होता. परंतु कुठल्याही प्रकारची चौकशी वा कारवाई झालेली नाही.सर्व प्रकरणे तडजोडीने मिटवली गेली किंवा दडपवून टाकली गेली असावी अशी आमची धारणा आहे.

करीता एकंदरीत विनंती अशी आहे की तलवाडा ग्रामपंचायत ने केलेल्या सर्वच कामांची यथायोग्य उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या मार्फत निपक्षपातीपणे चौकशी करुन दोषी अधिकारी ,कर्मचारी, इंजिनीयर , ग्रामसेवक व सरपंच त्यांचे विरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करण्यात येऊन कठोर कारवाई करण्यात यावी. हीच नम्र विनंती आहे . जोपर्यंत गुन्हे दाखल होत नाहीत होत नाहीत तोपर्यंत हे अमरण उपोषण सुरूच राहणार आहे







## पंकजा मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

शिरुर (प्रतिनिधी)

**तालुक्यातील हिवरसिंगा येथील जिल्हापरिषद शाळेच्या प्रागंणात भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पंकजा मुंडे यांनी वाढदिवस साध्या पध्द्तीने साजरा करणार असल्याचे आणि कार्यकर्त्यांना हि हार-तुरे स्वीकार नाही असे आवाहन केले होते यामुळे पंकजा मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त हिरवरसिंगा ग्रामस्थांनी वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा केला . वृक्षारोपण डॉ.सारिका क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले** . वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे डॉ.क्षीरसागर प्रतिपादन यांनी केले.

यावेळी मंगेश सानप, बाळासाहेब दुधाळ, अनिकेत सानप, केतन गायकवाड, विजय हतागळे,श्रीराम सानप,अभिजित सानप,मुकुंद बडे तसेच शाळेतील शिक्षक, ग्रामस्थ तरुण बांधव उपस्थित होते.

# जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे आमचे कर्तव्य-डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिराचे उद्घाटन

बीड (प्रतिनिधी)

उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांचा वाढदिस सामाजिक उपक्रमांनी साजरा करत आहोत. पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त चष्मा असलेल्या रुग्णांवर ‘लॅसिक’ शस्त्रक्रियेचे आयोजन केले होते. आपण वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असल्याने बीड मतदारसंघातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे आमचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त व कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे मार्गदर्शनाखाली आयोजित मोफत आरोग्य शिबिराचे शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात शनिवारी (दि.२७) सकाळी ११.३० वाजता उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, आरोग्य शिबिराचे समन्वयक संजय सेवलकर, निजाम पठाण, अधिव्याख्याता डॉ.सय्यद अमजद, लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, नगरसेवक शुभम धूत, अल्पसंख्याक सेलचे तालुकाध्यक्ष समीर शेख, ईश्वर धनवे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष माजेद कुरेशी, महिला आघाडीच्या शालिनीताई परदेशी,




सरपंच साईनाथ कैतके, शेख खदिर, गजानन देवकर, धनंजय वाघमारे, गुड्डू चाऊस, विठ्ठल गुजर, माऊली मारकड, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, ग्रामीण भागात आजही आरोग्य सुविधांची कमतरता आहे. मी आणि डॉ.सारिका या आरोग्य क्षेत्रात कार्यरत असल्याने आम्हाला त्याची जाण आहे. आपल्या भागातील गरजू रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिबिराचे आयोजन केले आहे. आरोग्य शिबिराचे समन्वयक डॉ.संजय सेवलीकर म्हणाले, आरोग्य शिबिरात सर्व आजारांवर निदान करण्यात येईल. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ मिळवून दिला जाईल. रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या जातील, हे शिबिर रुग्णांसाठी लाभदायी ठरेल असे मत व्यक्त केले. आरोग्य शिबिराचे समन्वयक निजाम पठाण यांच्यासह तज्ञ डॉक्टरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार डॉ.रमेश शिंदे यांनी मानले. या शिबिरात प्रत्येक आजारावरील तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती होती. सकाळच्या सत्रात रुग्णांची मोठी गर्दी होती.

**आरोग्य क्षेत्रात काम करण्याचे स्व.केशरकाकुंचे स्वप्न पूर्ण करू : डॉ.सारिकाताई क्षीरसागर**

स्व.केशरकाकू यांच्या काळात आरोग्याच्या सुविधांची कमतरता होती. त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात सुविधा निर्माण केल्या. डॉ.योगेश क्षीरसागर यांना स्व.केशरकाकूंनी वैद्यकीय क्षेत्रात पाठवले. त्यांचं आरोग्य क्षेत्रात काम पूर्ण करण्याचं स्वप्न आम्ही पूर्ण करू, असे प्रतिपादन डॉ.सारिका क्षीरसागर यांनी केले.

### तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती;मोफत शस्त्रक्रिया होणार

आरोग्य शिबिरात रुग्णांची ब्लड प्रेशर, शुगर, हृदय, ईसीजी तपासणी, ठराविक औषधे मोफत देण्यात आली. डोळे तपासणीनंतर अल्प दरात चष्मे देण्यात येत आहेत. स्त्रियांच्या विविध आजारावर निदान करण्यासाठी तज्ञ डॉक्टर उपस्थित होते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हृदयाची अँजिओग्राफी, कॅन्सर शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, तिरळेपणाच्या शस्त्रक्रिया, मूत्रमार्ग शस्त्रक्रिया, गर्भ पिशवी दुरुस्ती, डायलिसिस, हर्निया शस्त्रक्रिया, डोळ्याच्या सफेद पडद्याची शस्त्रक्रिया, हाडांचे फॅक्चर, बायपास, कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, हृदयाला असलेले छिद्र, मणक्याच्या शस्त्रक्रिया, मोतीबिंदू, छाती आणि पोटाची शस्त्रक्रिया, व्हॉल्व रीप्लेसमेंट आदी शस्त्रक्रिया सर्व सोयीसुविधायुक्त नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत केल्या जाणार आहेत.

# मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचा गरजु दिव्यांगांनी लाभ घ्यावा!

## शिबीर आयोजक विजयसिंह पंडित यांचे आवाहन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि साधु वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, दि.२८ जुलै २०२४ रोजी र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे सकाळी १० वाजता मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीराचे उद्घाटन आष्टीचे आमदार बाळासाहेब आजबे यांच्या शुभहस्ते होणार आहे. शिबीरात गरजू दिव्यांगांना अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबरपासून निर्मित अत्यंत हलके व मजबुत कृत्रिम हात व पाय मोफत बसवून दिले जाणार आहेत. गरजू दिव्यांगांनी शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन केले आहे. रविवार, दि.२८ जुलै रोजी सकाळी १० वाजता र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे आयोजित शिबीराचे उद्घाटन आ. बाळासाहेब आजबे यांच्या शुभहस्ते होणार आहे. शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि साधु वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबीरात अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबरपासून निर्मित, अत्यंत हलके व मजबुत कृत्रिम अवयव उपलब्ध करून दिले जाणार आहेत. कृत्रिम अवयव लावल्यानंतर मनुष्य चालू शकणार आहे, टेकडी चढू शकतो, सर्व दैनंदिन कामे करू शकतो त्याचबरोबर सायकल सुध्दा चालवू शकतो. त्यामुळे या सुवर्ण संधीचा लाभ गरजू दिव्यांगांनी घ्यावा असे आवाहन विजयसिंह पंडित यांनी केले आहे.



रविवार, दि.२८ जुलै २०२४ रोजी सकाळी १० वाजता र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे आयोजित या शिबीरात तज्ञांकडून केवळ हात आणि पायाची मापे घेतली जाणार आहेत. माप घेतल्यानंतर सुमारे ४० दिवसांनंतर अवयव वाटप केले जाणार आहेत. अत्यंत अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे मजबुत आणि वजनाने हलके अवयव मोफत वाटप केले जाणार आहेत. या शिबीराचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी दिव्यांगांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

## गेवराईतील ग्रामीण भागात मध्यरात्रीनंतर घिरट्या घालणारे ड्रोन कुणाचे?



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : मागील १५-२० दिवसापासून गेवराई तालुक्यातील गोदावरी नदी परिसरात तसेच ग्रामीण भागात आणि शहरातील मुख्य वसाहत ठिकाणी ड्रोन रात्र-बेरात्र घिरट्या घालत असल्याने नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गोदावरी नदीच्या काठावरील पंचाळेश्वर, राक्षसभूवन, सावळेश्वर तसेच गेवराई शहरातील नविन वसाहत आणि ग्रामीण भागातील राजपिंपरी, पांढरवाडी गावखेड्यात मागील १५ दिवसापासून मध्यरात्रीनंतर ड्रोन घिरट्या घालत आहे. मात्र, ड्रोन कोणाचे अन् कशामुळे घिरट्या घालत आहे. याची माहीती उपलब्ध झालेली नाही. मग घिरट्या घालणारे ड्रोन कुणाचे हा एक कुतूहलाचा विषय बनला आहे.दरम्यान, गेवराई शहरात व ग्रामीण भागात फिरणारे ड्रोन हे पोलीस प्रशासनाचे नसल्याचे सहायक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ यांनी सांगीतले. तर काही दिवसापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाचे ड्रोन फिरले असल्याची माहीती असून, मात्र, सद्यपरिस्थितीत फिरणारे ड्रोन महसूल विभागाचे नसल्याचे सांगितले जात आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT